ISBN No. : 978-81-924687-7-8

# PROCEEDING

of


State level Seminars

on


## Well-Being of Adolescence

Sponsored by UGC

## Vasantrao Naik & Agricultural Development of Maharashtra









**Editor**

Prin. Dr. M. M. Fartade

**Co-Editor**

Shri. S. H. Mohite    Shri. S. B. Shinde    Dr. V. M. Gurame

महत्वाचा लेख

प्रा. खिलारे. S.S.

Organized by

Department of Psychology    Department of Economics

Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi

Dist- Solapur, Maharashtra - India 413411.

Scanned by CamScanner

Shri Shivaji Shikashan Parsarak Mandal Barshi's

# Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi.

DEPARTMENT OF

## PSYCHOLOGY & ECONOMICS

# PROCEEDING

**State Level Seminars**
**on**
***"WELL-BEING OF ADOLESCENCE"***
***&***
***"VANSANTRAO NAIK AND AGRICULTURAL DEVELOPMENT OF MAHARASHTRA"***

**Editor**

Prin. Dr. M. M. Fartade

**Co- Editor**

Shri. S. H. Mohite
Shri. S. B. Shinde
Dr. V. M. Gurame

**PUBLISHER**
**Laxmi Book Publication Solapur.**
**ISBN No: 978-81-924687-7-8**

Scanned by CamScanner

# INDEX OF PSYCHOLOGY


| Sr. No. | Titel of paper | Author Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | The Comparative Study of Stress of Daily Events In Senior College Students | Dr. A. C. Shinde | 01 |
| 2 | Study of Adjustment And Self Concept of Adolescents | Dr. Bhosale. U. V. | 05 |
| 3 | Anxiety Level of Adolescent: A Clinical Study | Shri. G. V.Lokhande | 09 |
| 4 | Study of Emotional Maturity ond Self Concept of Adolescents | Shri. A. B. Chandanshive | 11 |
| 5 | The Changing Lifestyle of Adolescents | Shri. S. H. Mohite | 15 |
| 6 | Effect of Life Style on Adolescence | Shri K. S. Patil | 18 |
| 7 | A Study of Relation Between Body Image and Depression among Adolescents | Dr. Sunita Watore | 21 |
| 8 | Mobile phone and Internet addiction among Adolescents | Shri. Arvind Kakulte | 24 |
| 9 | A Comparative Study of Rural and Urban Students Study Habit and Educational Adjustment | Shri. Ramdas Kolekar | 27 |
| 10 | A Comparative Study of Adolescences Personality Traits Psychoticism Between Sports Student and Non-Sports Students | Shri. S. D. Gadhave<br>Shri. V. S. Shinde | 29 |
| 11 | The Physical and Mental Changes in Adolescents | Dr. Kadam A. B.<br>Shri. Palke R. B. | 31 |
| 12 | A Study of The Growth of Experimental Mind and Achievement in Science During Adolescence | Dr. Bhilegaonkar S. D. | 35 |
| 13 | Development of Adolescence Through Education | Shri. M. V. Mate | 39 |
| 14 | वसतिगृहात राहणाऱ्या मुली व वसतिगृहात न राहणाऱ्या मुलींमधील समायोजाचा तुलनात्मक अभ्यास. | प्रा. डॉं. निंबाळकर एम. आर. | 41 |
| 15 | किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांची सृजनशीलता विकसीत करण्यामध्ये शिक्षकाची भूमिका. | प्रा. विजया जगताप | 45 |
| 16 | महाविद्यालयातील मृदु-कौशल्य विकास कार्यक्रमात (Soft Skill Developoment Programme) सहभागी झालेल्या व सहभागी न झालेल्या किशोरवयीन मुलांच्या व्यक्तिमत्वातील स्व-आत्मविश्वास या घटकाचा तुलनात्मक अभ्यास करणे. | श्री. राजेंद्रकुमार डांगे | 49 |
| 17 | किशोरांच्या आक्रमकतेचा अभ्यास | कु पाटील संजीवनी जगदीश | 51 |
| 18 | किशोरावस्थेतील सर्जनशील कवितांचे स्वरूप | डॉ. रविकांत शिंदे | 54 |
| 19 | किशोरावस्थेतील व्यसनाधीनता | डॉ. भारती रेवडकर | 56 |
| 20 | पौगंडावस्थेची शालेय गुणवत्ता आणि अभ्यास सवयींचा तुलनात्मक अभ्यास | प्रा.डॉ. बी. ए. मेटील | 60 |


Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांची संपादन प्रेरणा - तुलनात्मक अभ्यास | श्री. खिलारे संदीप सिताराम | 63 |
| 22 | किशोरावस्था व  शारिरीक, मानसिक बदल | श्री पंडित महादेव लावंड | 66 |
| 23 | भारतीय समाजातील कुमारावस्थेच्या समस्या व शिक्षकाची भूमिका | डॉ. विष्णू बब्रुवान वाघमारे | 69 |
| 24 | किशोराव्यस्थेतील व्यसनाधिनता | डॉ आनंद सुभाष करडे | 71 |
| 25 | किशोरावस्था के  छात्रों का मनोवैज्ञानिक विकास | प्रा. डॉ. रविराज फुरडे | 73 |
| 26 | कुमारावस्थेतील सर्जनशीलतेचा विकास | डॉ. ज्योती माळी | 75 |
| 27 | शिक्षकांच्या अपेक्षांच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा विषयक ताणतणावावर होणारा परीणाम | श्री. मोहोळकर संदीप सुभाष<br>डॉ . शिखरे व्ही.  पी. | 77 |
| 28 | किशोरावस्थेतील व्यसनाधिनता एक सामाजिक समस्या | श्री. सरवदे गुणवंत मुकुंदराव | 80 |
| 29 | कुमार आवस्थेत खेळामुळे शरीरीक व मानसिक सुधारणा. | श्री. जी. एस. फरताडे,<br>श्री. आर. एस. नागटिळक | 82 |
| 30 | खेळाडूच्या मानसिक  प्रशिक्षणाकत मानसशास्त्रीय तंत्राचा अभ्यास | श्री. निंबाळकर व्ही. एस.<br>प्रा. सौ. के. व्ही. जाधव | 84 |
| 31 | कुमारांच्या सृजनशीलतेचा विकासः शिक्षकांची भूमिका व उपक्रम | श्री. पी. ए. पाटील | 87 |
| 32 | सर्जनशीलता व किशोराचे व्यक्तिमत्व | श्री सुभाष माळी | 89 |
| 33 | कुमारावस्था : जीवन कौशल्य शिक्षणाकरीता उत्तम कालखंड | श्री. वैभव जालिंदर वाघमारे | 91 |
| 34 | निवडक मनाचे श्लोक व दासबोधातील निवडक ओव्या यावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रमाचा महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या आध्यात्मिक गुणांक व स्व-संवेदित वैशिष्टये यावरील परिणाम ' | डॉ. मानसी राजहंस | 93 |
| 35 | कायम विनानुदानित आणि अनुदानित शाळामधील शिक्षकांच्या जीवन समाधानाचा तुलनात्मक अभ्यास | श्री. सुरवसे एस. व्ही. | 96 |
| 36 | कुमारावस्थेतील बालकांच्या व्यक्तिमत्त्व विकासावरील प्रसारमाध्यमांचा परिणाम | डॉ. डिसले महादेव सदाशिव | 99 |


Scanned by CamScanner

# आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांची संपादन प्रेरणा - तुलनात्मक अभ्यास

श्री. खिलारे संदीप सिताराम
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर ता. जुन्नर, जि.पुणे

**समस्या -**

आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**प्रस्तावना -**

व्यक्तिच्या वर्तनाला चालना देणारा घटक म्हणजे प्रेरणा होय. आपल्या वर्तनाचे विविध पैलु यामध्ये व्यक्तिच्या गरजा, इच्छा, महत्त्वाकांक्षा, व्यक्तिस कृतीपण बनवितात. ध्येयापर्यंत धडपड करायला लावतात. हे संपादन प्रेरणेवर आधारित असते. व्यक्ति एखादे कार्य कोणत्या प्रकारे व मार्गाने करते यावर संपादन प्रेरणेचा परिणाम होतो. थोडक्यात आपल्या दैनंदिन जीवनावर संपादन प्रेरणेचा परिणाम होतो.

संपादन प्रेरणा म्हणजे अवघड कामे आव्हाने म्हणुन स्विकारुन यश संपादन करणे व कामाच्या उत्कृष्ठतेची पातळी गाठणे होय.

संपादन प्रेरणेसंबंधी संकल्पना सर्वप्रथम इ.स. १९३८ मध्ये हेन्री मरे यांनी मांडली. एखादी अवघड ध्येय साध्य करण्यासाठी खुप प्रयत्न करणे, उच्च दर्जाचे यश मिळविणे, प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळविण्याची जिदद बाळगणे, बुध्दीचातुर्य वापरुन आपली अस्मिता सुधारणे इ. गोष्टींनी संपादन प्रेरणा सुचित होते. या आणि अन्य काही प्रेरणांच्या मापनासाठी मरे यांनी कथावस्तु आसंवेदन (Thematic Apperception test-TAT) चाचणी विकसीत केली.

मॅक्लेलँड व त्याच्या सहकाऱ्यांनी (१९६१-१९८७) मरेच्या संकल्पनेला सुनिश्चित स्वरुप दिले. कॅक्लेलँड च्या लिखानात संपादन प्रेरणेचा उल्लेख संक्षिप्त रुपात nAch असा केलेला आढळतो. त्यांच्या संशोधनानुसार मुलांचे संगोपन कसे केले जाते यावर त्यांच्या संपादन प्रेरणेचे स्वरुप अवलंबुन असते. विंटर बॉटम (१९८३) यांना आपल्या अभ्यासात असे दिसुन आले की, मुलांकडुन लहान वयातच स्वावलंबन आणि स्वतंत्र वृत्तीच्या अपेक्षा करण्यात आल्या तर त्यांच्यात संपादन प्रेरणेचा शीघ्रतेने विकास होतो. मिश्रा आणि अगरवाल (१९८५) या अभ्यासकांना असे आढळले की, संपादन प्रेरणेवर अनुभवाचा आणि अध्ययनाचा खुप प्रभाव पडतो.

**उद्दिष्टये -**

१) आदिवासी आणि बिगर आदिवासी विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेचा अभ्यास करणे.
२) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन मुलांच्या संपादन प्रेरणेचा अभ्यास करणे.
३) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन मुलींच्या संपादन प्रेरणेचा अभ्यास करणे.

**सिध्दांत कल्पना -**

१) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांमधील संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसुन येत नाही.
२) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन मुलांमध्ये संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसून येत नाही.
३) आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन मुलींमध्ये संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसुन येत नाही.

**संशोधन पध्दती -**

१) नमुना -

सदर शोध निबंधासाठी आदिवासी आणि बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांची निवड केली. जुन्नर येथील शाळांमधील ९ वी व १० वी मधील १४ ते १६ वयोगटातील विद्यार्थ्यांची यादृच्छिक पध्दतीने निवड केली.

या शोध निबंधासाठी एकुण १०० विद्यार्थी-विद्यार्थीनी निवडण्यात आल्या. आदिवासी ५० विद्यार्थ्यांपैकी २५ मुले व २५ मुली तसेच बिगर आदिवासी ५० विद्यार्थ्यांपैकी २५ मुले व २५ मुलींची निवड केली.



Scanned by CamScanner

**२) साधने (Tools)** -

सदर शोध निबंधासाठी प्रतिभा देव आणि आशा मोहन (१९७१) यांची Achivement Motivation Scale या चाचणीचा वापर करण्यात आला. चाचणीमध्ये एकुण ५० विधाने असुन १३ विधाने नकारात्मक आणि ३७ विधाने ही नकारात्मक स्वरुपाची आहेत. प्रत्येक विधानास पाच पर्याय दिले आहेत. (नेहमीच, वारंवार, बऱ्याचदा, क्वचितच, केव्हाच नाही) आधारे ठरविण्यात आली.

१) Academic Motivation २) Need of Achievement ३) Academic Challenge ४) Achievement anxiety ५) Importance of grades/marks ६) Meaningfulness of task ७) Relevance of school/college to future goals ८) Attitudes towards education ९) work methods १०) Attitudes towards teachers ११) Interpersonal relations )१२) Individual concern १३) Dramatics १४) Sports.

**चाचणीची विश्वसनीयता** - चाचणी पुर्नचाचणी पध्दतीने ०.६९ आढळुन आली तर चाचणीची यथार्थता - ०.५४ इतकी आढळुन आली.

**३) संख्याशास्त्र** -

प्रदत्ताचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी मध्यमान (mean) प्रमाण विचलन (SD) आणि टी मुल्य (t test) चा वापर केला.

**कार्यपध्दती** -

प्रथम जुन्नर तालुक्यातील दोन आश्रमशाळा व दोन खाजगी शाळांमधुन आदिवासी आणि बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची रॅण्डम सॅम्पलींग पध्दतीने निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना संपादन प्रेरणा चाचणी देऊन सुचना दिल्या चाचणीतील प्रत्येक विधानास पाच पर्याय दिले असुन त्यापैकी एका पर्यायास फुलीची खुण करणे, कोणतेही विधान गाळु नये, कोणतेही विधान चुक-बरोबर नाही तेव्हा न घाबरता व प्रमाणिकपणे उत्तरे द्या अशा प्रकारे चाचणी सोडवुन घेतली.

**फलिते** -

प्रस्तुत शोध निबंधामागे आदिवासी आणि बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची संपादन प्रेरणा या घटकांचे मध्यमान, प्रमाण विचलन, आणि टी मुल्य काढण्यात आले. या फलितांचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

**(१) आदिवासी आणि बिगर आदिवासी विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणामधील भेद**

| समुह | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मुल्य | विवरण |
|---|---|---|---|---|---|
| आदिवासी विद्यार्थी | ५० | १३०.७ | २०.७७ | ४.४२ | ०.०१ या पातळीवर विश्वसनीय |
| बिगर आदिवासी विद्यार्थी | ५० | १४८.१ | १८.५२ | | |

वरील तक्त्यानुसार आदिवासी विद्यार्थ्यांचे मध्यमान १३०.७ आणि प्रमाण विचलन २०.७७ इतके आढळुन आले. तसेच बिगर आदिवासी विद्यार्थ्यांचे मध्यमान १४८.१ आणि प्रमाण विचलन १८.५२ इतके आढळुन आले. या दोन्ही समुहाच्या मध्यमानातील फरक दर्शविणारे टी मुल्य ४.४२ इतके आढळुन आले. हे टी मुल्य ०.० पातळीवर विश्वसनीय आहे. म्हणुन शोधनिबंधात मांडलेली शुन्य सिध्दांत कल्पना, आदिवासी आणि बिगर आदिवासी विद्यार्थ्यांमधील संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसून येत नाही. नाकारण्यात आली म्हणजेच आदिवासी आणि बिगर आदिवासी विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसुन आला.

**(२) आदिवासी व बिगर आदिवासी किशोरवयीन मुलांच्या संपादन प्रेरणेमधील भेद**

| समुह | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मुल्य | विवरण |
|---|---|---|---|---|---|
| आदिवासी विद्यार्थी | २५ | १३२.५ | २३.४९ | ३.०३ | ०.०१ या पातळीवर विश्वसनीय |
| बिगर आदिवासी विद्यार्थी | २५ | १५०.५ | १८.११ | | |



Scanned by CamScanner

या तक्त्यानुसार आदिवासी मुलांचे मध्यमान १३२.५ आणि प्रमाण विचलन २३.४९ इतके आढळले. तरेच बिगर आदिवासी मुलांचे मध्यमान १५०.५ आणि प्रमाण विचलन १८.११ इतके आढळले. या दोन समुहांच्या मध्यमानातील फरक दर्शविणारे टी मुल्य ३.०३ इतके आढळले. टी मुल्य ०.०१ या पातळीवर विश्वसनीय आहे. म्हणुन शोध निबंधातील दुसरी शुन्य सिध्दांत कल्पना आदिवासी व बिगर आदिवासी, किशोरवयीन मुलांमध्ये संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसुन येत नाही. नाकारण्यात येते. म्हणजेच आदिवासी व बिगर आदिवासी किशोरवयीन मुलांमध्ये संपादन प्रेरणेबाबत लक्षणीय भेद दिसुन येतो.

(३) आदिवासी व बिगर आदिवासी किशोरवयीन मुलींच्या संपादन प्रेरणेमधील भेद

| समुह | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मुल्य | विवरण |
|---|---|---|---|---|---|
| आदिवासी विद्यार्थी | २५ | १२८.९ | १७.४५ | ३.२९ | ०.०१ या पातळीवर विश्वसनीय |
| बिगर आदिवासी विद्यार्थी | २५ | १४५.७ | १८.६१ | | |

या तक्त्यानुसार आदिवासी मुलींचे मध्यमान १२८.९ आणि प्रमाण विचलन १७.४५ इतके आढळले तसेच बिगर आदिवासी मुलींचे मध्यमान १४५.७ आणि प्रमाण विचलन १८.६१ इतके आढळले. या दोन समुहाच्या मध्यमानातील फरक दर्शविणारे टी मुल्य ३.२९ इतके आढळले. हे टी मुल्य ०.०१ या पातळीवर विश्वसनीय दिसुन आले. म्हणुन शोध निबंधात मांडलेली तिसरी शुन्य सिध्दांत कल्पना येते. म्हणजेच आदिवासी व बिगर आदिवासी किशोरवयीन मुलींच्या संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसुन येते नाही. ही नाकारण्यात येते. म्हणजेच आदिवासी व बिगर आदिवासी किशोरवयीन मुलींच्या संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसुन येतो.

**निष्कर्ष -**

१) आदिवासी व बिगर आदिवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसून येतो. म्हणजेच आदिवासी विद्यार्थ्यांच्या तुलनेत बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची संपादन प्रेरणा जास्त दिसून येते.

२) आदिवासी व बिगर आदिवासी किशोरवयीन मुलांच्या संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसून येतो. म्हणजेच आदिवासी मुलांच्या तुलनेत बिगर आदिवासी मुलांची संपादन प्रेरणा जास्त दिसुन येते.

३) आदिवासी व बिगर आदिवासी किशोरवयीन मुलींच्या संपादन प्रेरणेमध्ये लक्षणीय भेद दिसुन येतो. म्हणजेच आदिवासी मुलींच्या तुलनेत बिगर आदिवासी मुलींची संपादन प्रेरणा जास्त दिसुन येते.

**संदर्भ -**

१) CICCARELLI, s. & MEYER, G.E.: Psychology, New Delhi, Pearson Education (२००६).
२) GARRETT H. E. : statistics in Psychology and Education (१९७९)
३) SINGH A.K. : Tests, Measurements and Research Methods in behavioura Sciences, Tata McGraw Hill Publication. com, Ltd. New Delhi, (१९९३)
४) डॉ. बोरुडे रा. र. :- संशोधन पध्दतीशास्त्र पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन (२००५)



Scanned by CamScanner

ज्ञान विज्ञान विमुक्तये

UGC Sponsored

## STATE LEVEL SEMINAR

"WELL-BEING OF ADOLESCENCE"

(WBA-2013)

Organized by

Department of Psychology

## SHRI SHIVAJI MAHAVIDYALAYA, BARSHI.

# CERTIFICATE

This is to certify that Mr. / ~~Miss~~. / ~~Dr~~. Sandip Khilare of Shri Shiv chhatrapati Mahavidyalaya, Junnar has "participated actively" / "worked as resource person" / "worked as a chair person" / "presented a paper entitled, आदीवासी आणि बिगर-आदीवासी किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेचा तुलनात्मक अभ्यास" in state level seminar 'WBA-2013' held on 7 th September 2013. His / Her contribution to the seminar is highly appreciated.

TRUE COPY
Principal
S. S. C. College Junnar

| Dr. V. M. Gurame | Mr. S. H. Mohite | Dr. T. S. More | Dr. M. M. Fartade |
|---|---|---|---|
| Organizing Secretary | Convener | Co-ordinator | Principal |
| (WBA-2013) | (WBA-2013) | (WBA-2013) | Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi |

Scanned by CamScanner